# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/०९/२०१८

## खुन व हुंडाबळीचे गुन्हयातील आरोपीतांना मा.न्यायालयाने सुनावली सक्तमजुरीची शिक्षा

---

गतवर्षी वणी पोलीस ठाणे हद्दीत परपमोरी शिवारात श्री. शाम श्रीराम चकोर (मयत) यांना ०३ आरोपीतांनी चोर समजुन जबर मारहाण केली व मारहान करतांना झटापटीत शाम चकोर यांना लोखंडी ॲंगलवर ढकलुन देवुन त्यांना डोक्यास गंभीर दुखापत झाली व रक्तश्राव जास्त झाल्याने ते जागेवरच मयत झाले, त्यानंतर आरोपी इसमांनी मयत हा वरच्या मजल्यावरून पडुन दगडावर डोके आपटले असल्याचे भासवुन मयत झाला असल्याचा बनाव केल्याचे निष्पन्न झाले होते. सदर बाबत मयताची आई श्रीमती लिलाबाई श्रीराम चकोर यांनी फिर्याद दिलेवरून वणी पोलीस ठाणेस । गुन्हा रजि.नं. ११३/२०१७ भादवि कलम ३०२,२०१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात आरोपी नामे १) फुलान रामभवन राय, २) राधिका फुलन राय, ३) रामविलास शिवपुंजन राय, सर्व रा. बॉटल कंपनी गोडावुन, लखमापुर फाटा, परमोरी शिवार, ता.दिंडोरी यांना तात्काळ अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार **पोलीस उपनिरीक्षक श्री.गणेश सुर्यवंशी** यांनी गुन्हयातील आरोपींविरूध्द सबळ पुरावे गोळा करून, गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने अतिशय चिकाटीने तपास करून मा. जिल्हा व अति.सत्र न्यायालय कोर्ट नं. ४, नाशिक न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर खटल्यात दिनांक ०४/०९/२०१८ रोजी मा. जिल्हा व अति.सत्र न्यायाधीश श्री. गिमेकर सो. कोर्ट नं.४, नाशिक न्यायालयाने सदर गुन्हयातील आरोपींविरुध्द तपासी अंमलदार यांनी सादर केलेले सबळ पुरावे व साक्षीदारांनी दिलेल्या साक्षीस अनुसरून **आरोपी नामे १) फुलान रामभवन राय, २) राधिका फुलन राय, ३) रामविलास शिवपुंजन राय,** सर्व रा. बॉटल कंपनी गोडावुन, लखमापुर फाटा, परमोरी शिवार, ता.दिंडोरी यांना दोषी ठरवुन भादवि ३०४ भाग २ अन्वये प्रत्येकी **०५ वर्षे सक्तमजुरी व ०५ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद, तसेच कलम २०१ अन्वये ०३ वर्षे सक्त मजुरी व ०३ हजार रू.दंड, दंड न भरल्यास ०२ महिने साधी कैद अशी शिक्षा** सुनावली आहे. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री निकम यांनी कामकाज पाहिले.

तसेच सन २०१६ मध्ये डिसेंबर महिन्यात पेठ पो.स्टे.हद्दीतील आसरबारी शिवारातील महिला जनाबाई दुर्गादास जाधव, वय ३७ (मयत) यांचेवर त्यांचे पती आरोपी नामे दुर्गादास काशिनाथ जाधव, वय ४१, रा. आसरबारी, ता.पेठ याने चारित्रावर संशय घेवुन वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करून, कुर वागणुक देवुन वाईट साईट शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहान करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले म्हणुन मयत महिलेचे वडील नामदेव सखाराम चौधरी, रा. बोरीपाडा, ता.त्रंबकेश्वर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पेठ पोलीस ठाणेस । गुरनं ६८/२०१६ भादवि कलम ३०६, ४९८(अ),३२३,५०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात आरोपीस अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे **तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक श्री. डी.एस.मुंढे,** पेठ पो.स्टे. यांनी गुन्हयातील आरोपीविरूध्द सबळ पुरावे गोळा करून, गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने अतिशय चिकाटीने तपास करून मा. जिल्हा व अति.सत्र न्यायालय कोर्ट नं.६, नाशिक न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर खटल्यात दिनांक ०४/०९/२०१८ रोजी मा. जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश श्री झपाटे सो, कोर्ट नं.६, नाशिक न्यायालयाने सदर गुन्हयातील आरोपींविरुध्द साक्षीदारांनी दिलेली साक्ष व तपासी अंमलदार यांनी सादर केलेले सबळ पुराव्यास अनुसरून **आरोपी नामे दुर्गादास काशिनाथ जाधव, वय ४१, रा. आसरबारी, ता.पेठ** यास भादवि कलम ४९८(अ) अन्वये दोषी ठरवुन **०३ वर्ष सक्तमजुरी व ५ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास १ महिने कैद अशी शिक्षा** सुनावली आहे.

वरील दोन्ही गुन्हयांतील तपासी अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**,व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांनी अभिनंदन करून बक्षीसपत्र जाहिर केले आहे.